# शुभाशिष

**- प्राजक्ता पाडगावकर** (कमिंग, जॉर्जिया)



शतताराकांचे ओज तुझ्या चर्येस लाभो
शतमंदिरांचे पावित्र्य तुझ्या अंतरी वाहो
शतशब्दसडे तुझ्या पायी दरवळो
शतघन तुझ्या रुदनात राहो
अशी स्पटिकअंगी, प्रखर कणखर तू
अशी मुग्धलयीतील अलवार गझल तू
लाव दीप आज उरातला
दरवळू दे आसमंत सारा
उजळू दे प्रत्येक पाते
उजळू दे हरएक किनारा
नावा वल्हवा किनारो किनारी
तुझ्यातल्या ज्योतीचे गान सर्वत्र स्फुरू दे
शतस्पंदनाने ही काया फुलावी
शतसहस्त्रकात स्तुती तुझीच उरावी
अशी गेया, गार्गी तू व्हावी
अशी तू तुझ्यासारखीच जगावी!

***

**टीप:** ही कविता मी माझ्या लेकींसाठी लिहून ठेवली होती, प्रत्येक वाढदिवसाला त्यांना मी एखादी कविता लिहून भेट देते, त्या अजून लहान आहेत, त्यांना त्याचे अजिबात अप्रूप नाही, मात्र आताश्या माझी पाच वर्षांची कन्या माझ्या वाढदिवसाला- देखील एखाद दोन ओळी तिच्या नव्या अक्षरात सजवून मला देते, त्यावेळी एक वर्तुळ पूर्ण होताना मला भासते. आपल्या पाल्यासाठी सर्वोत्तम आपल्याला प्रत्येकाला हवेच असते, मात्र मला ते नेमके शब्दात पकडायचे होते, ते कुठेतरी नोंदवून ठेवायचे होते...ही कविता त्यासाठीचा एक छोटा प्रयत्न आहे.

***